2 OCT 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रा. कोळेकर यांना उत्कृष्ट आधिकारी पुरस्कार

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून केलेल्या कार्याबद्दल गौरव

प्रतिनिधी
वाकरे

यशवंतराव चव्हाण (केएमसी) कॉलेजमध्ये ज्युनिअर विभागाकडे गेली २५ वर्षे कार्यरत असणारे नूतन पर्यवेक्षक आणि कोल्हापूर विभाग उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचे कोल्हापूर विभागीय समन्वयक प्रा. राजेंद्र कोळेकर यांना महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून उत्कृष्ट कार्य केलेबद्दल 'उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी' म्हणून सन्मानीत करण्यात आले.



**मुंबई : प्रा. राजेंद्र कोळेकर यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार देताना शिक्षणमंत्री विनोद तावडे, राज्यमंत्री रवींद्र वायकर आदी मान्यवर.**

मुंबई विद्यापीठाच्या कॉन्व्होकेशन सभागृहात शिक्षणमंत्री विनोद तावडे, राज्यमंत्री रविंद्र वायकर यांच्या हस्ते त्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी अप्पर सचिव सीताराम कुंटे, मुंबई विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू देवानंद शिंदे, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रमोद येवले, राज्यसंपर्क अधिकारी अतुल साळुंखे प्रमुख उपस्थित होते.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून प्रा. कोळेकर यांनी अनेक श्रमसंस्कार शिबिरातून प्रबोधनाबरोबरच मनोरंजन व रचनात्मक विधायक कार्यक्रमातून अनेक लोकोपयोगी कामे केली. अनेक उपक्रमात त्यांचे योगदान आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 OCT 2017
पुढारी

# मुद्रणालय विभागाचे काम प्रशंसनीय : कुलगुरू डॉ. शिंदे

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाचा मुद्रणालय विभाग हा अग्रेसर आहे. या विभागाने आपल्या नावीन्यपूर्ण कामाचा ठसा उमटवला आहे. त्यामुळे हा विभाग प्रशंसनीय असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. मुद्रणालय विभागाच्या सुवर्णमहोत्सव वर्ष सांगता कार्यक्रमात डॉ. शिंदे बोलत होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विभागातील सेवानिवृत्त पस्तीस कर्मचाऱ्यांचा सत्कार केला. कार्यक्रमात प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत, उपकुलसचिव संध्या आडसुळे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक अधीक्षक भूषण पाटील यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रशेखर खामकर यांनी केले तर आभार आडसुळे यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 OCT 2017
पुढारी

# प्रभावी, अभ्यासू वक्ता ही काळाची गरज : प्र-कुलगुरू डॉ. शिर्के

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** वक्ता हा समाज परिवर्तनाचा प्रभावी घटक असतो. अभ्यासपूर्ण मांडणी ही व्यक्तिमत्त्वाला समृद्ध करत असते. विविध स्तरावरील वक्तृत्वामुळे समाज परिवर्तनास चालना मिळते व समाज सुधारणेच्या दिशेने वाटचाल करतो. सध्याच्या संगणकीय काळात चिंतनशील वक्ते कमी होत चालले आहे. म्हणून महाविद्यालयीन स्तरावर प्रभावी आणि अभ्यासू वक्ता ही काळाची गरज असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे न्यू कॉलेज व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी. बी. पाटील व्याख्यानमाला आणि सांस्कृतिक कार्यक्रम समिती यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात डॉ. शिर्के प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी डी. बी. पाटील होते. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 OCT 2017 तरूण भारत

# विद्यापीठात 'जैवविविधता संवर्धन'वर राज्यस्तरीय कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ – प्राणीशास्त्र अधिविभाग आणि महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, वन विभाग, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ४ ऑक्टोबर रोजी राजर्षी शाहू सभागृह येथे सकाळी साडेदहा वाजता राज्यस्तरीय जैवविविधता संर्वधन आणि जागृती एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ–नागपूर, भारतीय वन सेवा (निवृत्त) अध्यक्ष डॉ. विलास बर्डेकर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत.

कार्यशाळेमध्ये प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि पर्यावरणशास्त्राचे २०० विद्यार्थी तसेच, जिल्ह्यतील जैवविविधता व्यवस्थापन समिती सदस्य, अशासकीय संस्थाचे पदाधिकारी, वन विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. यामध्ये प्रा. डॉ. पी. डी. राऊत हे वन्यप्राणी संर्वधन, नांदेड विद्यापीठातील प्रा. डॉ. एस. पी. चव्हाण हे पक्षी आणि त्यांचे संर्वधन, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे सदस्य डॉ. ए. डी. जाधव हे मंडळाची कार्ये आणि त्यांचे जैवविविधतातील योगदान यावर व्याख्यान देणार आहेत. जैवविविधता मंडळाचे तांत्रिक अधिकारी विवेक डावरे हे जैवविविधता नोंदी, संर्वधन समिती याबाबतची माहिती देतील तर कोल्हापूरचे उप वन संरक्षक डॉ. प्रभु शुक्ल हे जिल्ह्यातील जैवविविधता याबाबत मार्गदर्शन करतील. आंबोली मलबार नेचर क्लबचे हेमंत ओगले हे पश्चिम घाटातील फुलपाखराच्या जैवविविधता यावर विचार मांडणार आहेत.

प्रा. डॉ. एस. आर. यादव हे पश्चिम घाटातील वनस्पतीचे संर्वधन यावर संशोधनपर माहिती देणार आहेत. कार्यक्रम संयोजन सचिव डॉ. ए. डी. जाधव तर डॉ. एम. व्ही. शांताकुमार हे समन्वयक राहणार आहेत. या कार्यशाळेचे आयोजनासाठी महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ नागपूर यांनी आर्थिक सहाय्य केले आहे. यासाठी विभागप्रमुख प्रा. डी. पी. डी. राऊत व मंडळाचे सदस्य डॉ. ए. डी. जाधव यांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आव्हान केले आहे.

कार्यशाळेचा समारोप कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांचे हस्ते सायंकाळी ५.०० वाजता संपन्न होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 OCT 2017
तरूण भारत

# अवयवदान जागृती शिबिराचे विद्यापीठात आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एम. बी. ए. अधिविभाग व छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने मरणोत्तर अवयवदान करण्याविषयी जागृती करण्याच्या हेतूने बुधवार दि. ४ ऑक्टोबर रोजी शिवाजी विद्यापीठातील मानव्यशास्त्र इमारत येथे जागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला सीपीआरचे अधिष्ठाता डॉ. जयप्रकाश रामानंद हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार असून अवयवदान विषयावर पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले आहे. शिबिरात सहभागी होवू इच्छिणाऱ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन डॉ. एच. एम. ठकार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 OCT 2017
पुढारी

# आयडियलचे पाच विद्यार्थी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

**इचलकरंजी (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने एप्रिल २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या एमबीए परीक्षेची गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली. यामध्ये आयडियल एमबीए महाविद्यालयाचे विद्यार्थी प्रथम पाच क्रमांक मानांकन यादीत चमकले. या मानांकन यादीनुसार सोनम बावणे-प्रथम, विद्या जाधव-द्वितीय, संदीप पाटील -तृतीय, आतिष काटकर-चतुर्थ, स्नेहा कोटी पाचव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. या विद्यार्थ्यांना संस्थापक चेअरमन कल्लाप्पाण्णा गावडे, श्रीनिवास गावडे, मोहन गोसावी, प्रा. डॉ. बी. टी. बंडगर, प्राचार्य ऐनापुरे यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले.